**योजना**

- के.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागा अंतर्गत एक स्वतंत्र विभाग म्हणुन कार्यरत आहे. संस्थेचे प्रादेशिक कार्यालय नागपूर येथे आहे.

- **मास्टर ऑफ लेबर स्टडीज (एम.एल.एस.)** - हा दोन वर्षे कालावधीचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम अनुक्रमे मुंबई व नागपूर येथे चालविला जात असुन, मुंबई व नागपूर विद्यापीठाशी तो संलग्न आहे.

- कामगार संघटनेच्या सक्रिय कार्यकर्त्यांसाठी **कामगार संघटना व औद्योगिक संबंध** हा नऊ महिने कालावधीचा पूर्णवेळ अभ्यासक्रम चालविला जातो. अशा पध्दतीने ९ महिन्याचा पूर्णवेळ अभ्यासक्रम कामगार कार्यकर्त्यांसाठी शासनातर्फे चालवणारी आजच्या मितीला **देशातील ही एकमेव संस्था आहे.** या बहुविध शिस्तविषयक अभ्यासक्रमामध्ये वेगवेगळया क्षेत्रातील अर्थशास्त्र, औद्योगिक संबंध, कामगार कायदे, संघटनात्मक वर्तणुक, औद्योगिक समाजशास्त्र, कामगार संघटना इ. विषयांचा समावेश आहे. यातून महाराष्ट्र राज्याच्या औद्योगिक विकासाकरिता आवश्यक असणारे औद्योगिक सलोख्याचे वातावरण निर्माण होण्यासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले

- संस्थेमध्ये **पीएच.डी. इन लेबर स्टडीज** करिता काही विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला होता. त्यांनी मुंबई विद्यापीठातर्फे पीएच.डी. ही पदवी संपादन केली आहे. पीएच.डी. संशोधनाकरीता विषयांची निवड करताना, धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता आवश्यक विषयांच्या अनुषंगाने संशोधन होईल याकडे संस्थेने भर दिला आहे.

- ग्रामीण श्रम विज्ञान केंद्र -. ग्रामीण भागातील सक्रिय तरुण कार्यकर्त्यांसाठी **आर्थिक नेतृत्व विकास प्रशिक्षण शिबीरे** संस्थेद्वारे आयोजित केली जातात. स्थानिक साधनसंपत्तीचा वापर करुन ग्रामीण महाराष्ट्रात स्वयंरोजगाराच्या संध्या उपलब्ध करुन देणे शक्य आहे या भूमिकेतून स्थानिक साधनसंपत्तीचा वापर कशाप्रकारे करावा, त्यातुन कोणती उत्पादने विकसित होऊ शकतील व त्याचे मार्केटींग कोणत्या पध्दतीने करावे यावर भर देऊन ही आर्थिक नेतृत्व विकास प्रशिक्षण शिबीरे महाराष्ट्रातील विविध भागात दरवर्षी आयोजित केली जातात.

- कामगार आयुक्त कार्यालयाच्या यंत्रणेसाठी प्रशिक्षण - संस्थेतर्फे कामगार आयुक्त कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी वेळोवेळी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात.

- राष्ट्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या व्ही.व्ही.गिरी नॅशनल लेबर इन्स्टिटयुटच्या सहकार्याने संस्थेमध्ये वेळोवेळी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

- संस्थेची प्रादेशिक शाखा नागपूर येथे असुन, तेथे मास्टर ऑफ लेबर स्टडीज (एम.एल.एस.) दोन वर्षे कालावधीचा पूर्णवेळ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविला जातो. सदर अभ्यासक्रमास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची मान्यता आहे.

**कायदे व नियम**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा,१९९४ अंतर्गत कामगार विषयक पदव्युत्तर पदवी शिक्षण आणि संशोधन संस्था म्हणुन मुंबई विद्यापीठाने मान्यता दिली आहे.

**ध्येय**

महाराष्ट्र राज्यामध्ये औद्योगिक क्षेत्रात शांतता नांदण्याकरिता मालक व कामगार यांच्यामध्ये संबंध सौदार्हपूर्ण रहाण्यासाठी कामगार कल्याण व उत्पादकता वाढवण्याकरिता आवश्यक असणारी मानवी संसाधने व्यावसायिक **(Professional)** तत्वावर विकसित करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन करणे.

**प्रश्नावली**

प्र. संस्थेतर्फे चालविल्या जाणा-या एम.एल.एस. अभ्यासक्रमासाठी पात्रता कोणती ?

**एम.एल.एस.** प्रवेशाकरिता कोणत्याही संविधिक विद्यापीठाचा पदवीधर. (प्रवेश परीक्षेसाठी पदवी परिक्षेच्या अंतिम वर्षाच्या परिक्षेला बसलेला उमेदवाराला मुभा देण्यात आलेली आहे.)

प्र.२. कामगार संघटना व औद्योगिक संबंध पदविका म्हणजे काय ?
कामगार संघटनेच्या सक्रिय कार्यकर्त्यांसाठी हा अभ्यासक्रम चालविला जातो. (किमान शैक्षणिक पात्रता एच.एस.सी.) (कामगार संघटनेच्या कामाचा अनुभव असलेल्या उमेदवाराकरिता शैक्षणिक पात्रता एस.एस.सी पर्यंत शिथिलक्षम)

प्र.३. प्रवेशाची क्षमता किती ?
एम.एल.एस., मुंबई ५२ + १ (+ १ कामगार संघटना व औद्योगिक संबंध पदविका अभ्यासक्रमामध्ये प्रथम श्रेणीत प्रथम येण-या उमेदवारास एम.एल.एस. अभ्यासक्रमासाठी थेट प्रवेश दिला जातो.)
एम.एल.एस. प्रादेशिक कामगार संस्था, नागपूर = ४०
कामगार संघटना व औद्योगिक संबंध पदविका, मुंबई = २५

प्र.४. निवड प्रक्रिया कशी आहे ?
१) एम.एल.एस. अभ्यासक्रमासाठी प्रवेश स्पर्धात्मक परीक्षेद्वारे दिला जातो. लेखी परीक्षा (**ASK Test, General Knowledge, Essay**)
२) गटचर्चा व वैयक्तिक मुलाखत. सदर अभ्यासक्रमाची माहिती पुस्तिका व अर्ज उमेदवारांना मे महिन्यामध्ये उपलब्ध असतात.

प्र.५. कामगार संघटना व औद्योगिक संबंध पदविका अभ्यासक्रमाची निवड प्रक्रिया कशी आहे ?
कामगार संघटना व औद्योगिक संबंध या पदविका अभ्यासक्रमासाठी निवड मुलाखतीद्वारे केली जाते.

माहितीच्या अधिकारा अंतर्गत १७ मॅन्युअल्सची माहिती अद्यावत करण्याकरीता आपल्या विभागास सादर करण्यात आलेली आहे. परंतु अद्याप सदर माहिती संकेतस्थळावर अद्यावत झालेली नाही. तरी १७ मॅन्युअल्सची माहिती अद्यावत व्हावी ही विनंती.

आपला विश्वासू,

( ए.को.गटकळ )
प्रबंधक.

सोबत:- सॉफ्ट कॉपीसह
D:/files/milsinf/100/acer.